**१०० युनिटपेक्षा कमी वापर असलेल्या दारिद्रय रेषेखालील आणि आर्थिक दृष्टया दुर्बल घरगुती वीज ग्राहकांकरिता स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार (SMART) योजना राबविणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२५/प्र.क्र.३५/ऊर्जा-७**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०६ ऑक्टोबर, २०२५.

**संदर्भ:-** महावितरण कंपनी पत्र क्र.अ.व्य.सं./०२९८६, दि.३०.०१.२०२५

**प्रस्तावना** :-

राज्यातील वाढते औद्योगिकीकरण व शहरीकरणामुळे पारंपारिक वीजेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. या वीजेची निर्मिती प्रामुख्याने कोळसा, पेट्रोलजन्य पदार्थ, नैसर्गिक वायु या ऊर्जा संसाधनांपासून होत आहे. सदर ऊर्जेची संसाधने मर्यादित स्वरुपात असून भविष्यात संपुष्टात येणारी आहेत. अशा ऊर्जा स्त्रोतांचा बेसुमार वापर केल्याने हवेच्या प्रदुषणात मोठी भर पडत आहे. यामुळे वैश्विक तापमान वाढ आणि पर्यावरण बदलाचा अनिष्ट परिणाम सर्वांना सोसावा लागत आहे. ग्लासगो येथे झालेल्या COP२६ परिषदेमध्ये भारताने अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट ५०० गिगॅवॅट ठेवले आहे. तसेच सन २०३० पर्यंत ५० टक्के इतकी ऊर्जा अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण करणे, एकूण अनुमानिक कार्बन उत्सर्जन १ अब्ज टनांनी कमी करणे, कार्बन तीव्रता २००५ च्या आर्थिक पातळीपेक्षा ४५ टक्क्यांनी कमी करणे तसेच २०७० पर्यंत निव्वळ शुन्य उत्सर्जनासाठी प्रयत्नशील राहण्यास भारताने कटीबध्दता दर्शविली आहे.

दारिद्र्य रेषेखालील अथवा मध्यमवर्गीय नागरिकांसाठी वीज वापर व त्याचे मासिक बील ही त्यांच्या उत्पन्नाच्या दृष्टीने मोठी खर्चाची बाब आहे. त्यामुळे सदर ग्राहकांना मासिक वीज बील वेळेवर भरणे जिकरीचे बनले आहे. त्याकरिता अपारंपारिक ऊर्जेचा वापर वाढविणे व वीजेच्या वापराचे बील शून्यापर्यंत कमी करणे असा दुहेरी उद्देश साध्य करणे गरजेचे आहे. त्यामुळे छतावरील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत वाढ करणे व घरगुती वीज ग्राहकांना वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविण्याकरिता दि.२९ फेब्रुवारी, २०२४ रोजी भारत सरकारद्वारे प्रधानमंत्री सुर्य घर मुफ्त बिजली योजना मंजूर करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने (MNRE) निर्गमित केलेल्या दि.१६.०३.२०२४ च्या आदेशानुसार दि.१३.०२.२०२४ पासून दरमहा ३०० युनिटपर्यंत मोफत वीज उपलब्ध करुन देण्यासाठी १ कोटी घरांना रुफटॉप सोलर यंत्रणा आस्थापित करण्याचे उद्दिष्ट जाहिर केले आहे. यापैकी महाराष्ट्र राज्याकरिता ८.७५ लाख घरांना रुफटॉप सोलर यंत्रणा आस्थापित करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. घरांवर सोलर रुफटॉप आस्थापित करण्यासाठी केंद्र शासनातर्फे २ कि.वॅ. क्षमतेपर्यंतच्या सौर ऊर्जा प्रकल्पांना आधारभूत किंमतीच्या ६०% इतके अनुदान देण्यात येत असून २ कि.वॅ. ते ३ कि.वॅ. दरम्यान क्षमता असणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पांना बेंचमार्क किंमतीच्या ४०% इतके अनुदान देण्यात येत आहे. अनुदानाची मर्यादा ३ कि.वॅ. क्षमतेपर्यत आहे.

आर्थिक दृष्टया दुर्बल वीज ग्राहकांनी सौर ऊर्जा प्रणालीचा अवलंब केल्यास वीजेच्या बाबतीत सदर ग्राहक स्वयंपूर्ण होईल तसेच सदर प्रणालीद्वारे निर्मित वीजेचा वापर करुन शिल्लक राहिलेल्या वीजेतुन त्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल. त्यामुळे सदर उपक्रमातंर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल गटातील घरगुती वीज ग्राहकांना राज्यशासनाकडून अधिकच्या अनुदानाची तरतूद करुन, त्यांना छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्याकरीता प्रोत्साहीत करणे व उपक्रमात त्यांचा सहभाग वाढविणे याकरीता **"स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (SMART) सोलार योजना"** राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

१) आर्थिक दृष्टया दुर्बल वीज ग्राहकांना छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यास प्रोत्साहित करुन वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविणे तसेच सौर ऊर्जेद्वारे निर्मित ऊर्जेच्या घरगुती वापरानंतर शिल्लक असलेल्या वीजेच्या विक्रीमधून त्यांच्या उत्पन्नाचा अतिरिक्त स्त्रोत निर्माण करणे व त्याद्वारे छतावरील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत वाढ करणे याकरीता **"स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (SMART) सोलार योजनेस** या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२) या योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील सुमारे १,५४,६२२ घरगुती वीज ग्राहक तसेच ज्यांचा वीज वापर १०० युनिटपेक्षा कमी आहे असे सुमारे ३,४५,३७८ आर्थिक दृष्टया दुर्बल घरगुती वीज ग्राहक असे एकूण ५,००,००० घरगुती ग्राहकांना छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी केंद्रशासनाद्वारे घोषित अनुदानव्यतिरिक्त अधिकचे अनुदान राज्य शासनातर्फे देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) या योजनेसाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी रु. ३३० कोटी व सन २०२६-२७ या वर्षासाठी ३२५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यास तसेच सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र वीज वितरण कंपनीस सहाय्यक अनुदान वितरित करण्याकरिता नवीन लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**२. योजनेचे उद्दिष्ट :-**

अ) दारिद्र्य रेषेखालील व आर्थिक दृष्टया दुर्बल वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातुन वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविणे.

ब) दारिद्र्य रेषेखालील व आर्थिक दृष्टया दुर्बल वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातुन उत्पन्नाचा अतिरिक्त स्त्रोत निर्माण करुन देणे.

क) छतावरील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत वाढ करणे.

ड) स्थानिक रोजगाराच्या संधी वाढवणे व अर्थव्यवस्थेचा विकास करणे.

**३. योजनेची संरचना :-**

या योजनेअंतर्गत, दारिद्र्य रेषेखालील सुमारे १,५४,६२२ घरगुती वीज ग्राहक व ज्यांचा वापर १०० युनिट पेक्षा कमी आहे असे सुमारे ३,४५,३७५ आर्थिक दृष्टया दुर्बल घरगुती वीज ग्राहक यांचेकरीता छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी राज्य शासनातर्फे अतिरिक्त अनुदानाची तरतूद करण्यात येणार आहे. त्याद्वारे सदर वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहीत करण्यात येणार आहे.

## ४. लाभार्थ्यांचा (वीज ग्राहक) गट निहाय हिस्सा व लागणारा निधी :-

सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी प्रति किलोवॅट आधारभूत किंमतीच्या अनुषंगाने राज्य शासनातर्फे प्रस्तावित अनुदानाचा हिस्सा खालील प्रमाणे असेल :-

| अ.क्र. | घरगुती वीज ग्राहकांचा गट (प्रकार) | | राज्य शासनाचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | दारिद्र्यरेषेखालील ग्राहक | | ३५% |
| २ | १०० युनिटपेक्षा कमी वापर असणारे आर्थिक दृष्टया दुर्बल ग्राहक | सर्वसाधारण गट | २०% |
| | | अनुसूचित जाती | ३०% |
| | | अनुसूचित जमाती | ३०% |

सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी प्रति किलोवॅट आधारभूत किंमत रु.५०,००० इतकी गृहीत धरल्यास वीज ग्राहक / राज्य शासन / केंद्र शासन यांचा हिस्सा खालीलप्रमाणे असेल :

| अ.क्र. | घरगुती वीज ग्राहकांचा गट (प्रकार) | | ग्राहकाचा हिस्सा (रू.) | राज्य शासनाचा हिस्सा (रू.) | केंद्र शासनाचा हिस्सा (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्र्यरेषेखालील ग्राहक | | २,५०० | १७,५०० | ३०,००० |
| २ | १०० युनिटपेक्षा कमी वापर असणारे आर्थिक दृष्टया दुर्बल ग्राहक | सर्वसाधारण गट | १०,००० | १०,००० | ३०,००० |
| | | अनुसुचित जाती | ५००० | १५,००० | ३०,००० |
| | | अनुसुचित जमाती | ५००० | १५,००० | ३०,००० |

## ५. योजनेसाठी लागणाऱ्या निधीची तरतूद व लेखाशिर्ष :-

SMART योजना राबविण्याकरीता राज्य शासनावर आर्थिक भार रु. ६५५ कोटी येणार आहे. राज्य शासनाच्या अर्थसंकल्पिय अनुदानातून या योजनेसाठी लागणारा निधी देण्यात येईल. तसेच सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादित यांस सहाय्यक अनुदान वितरित करण्याकरिता नवीन लेखाशिर्ष उघडून या लेखाशिर्षातर्गत सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये आवश्यक तरतूद करण्यात येईल. ही योजना केंद्र शासनाच्या योजनेशी संबंधित असल्याने केंद्र शासनाच्या योजनेतील पात्रता /अन्य निकषात बदल /सुधारणा झाल्यास त्या या योजनेस लागु राहतील.

## ६. योजनेची अंमलबजावणी :-

या योजनेच्या अंमलबजावणी करीता महावितरण कंपनी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम करेल.

७. **लाभार्थी निवडीचे निकष :-**

खालील निकषांची परिपूर्तता करणारे घरगुती वीज ग्राहक योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र असतील :

अ) ग्राहकाकडे वैध वीज कनेक्शन असणे आवश्यक आहे.

ब) ग्राहकाच्या कुटुंबाने छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी इतर कोणत्याही अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

क) इच्छुक ग्राहकाला राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक असेल.

ड) वीज ग्राहक थकबाकीमुक्त असणे आवश्यक असेल.

**निकष :-**

१) ज्या वीज ग्राहकांचा वीज वापर वर्ष २०२५(ऑक्टोबर-२०२४ ते सप्टेंबर-२०२५) मधील कुठल्याही महिन्यांत १०० युनिटपेक्षा जास्त नसेल असेच ग्राहक योजनेस भाग घेण्यास पात्र असतील.

२) फक्त सिंगल फेज वीज ग्राहकच योजनेत भाग घेण्यास पात्र असतील.

३) दारिद्रयरेषेखालील सर्व ग्राहकांना प्राधान्याने लाभ देण्यात येईल व द्रारिद्रय रेषेखालील ग्राहक वगळता इतर ग्राहकांसाठी सदर योजना “प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य” या तत्वावर राबवावी.

४) डिसेंबर २०२५ पर्यंत योजनेमध्ये दारिद्रय रेषेखालील ग्राहकांची संख्या १,५४,६२२ पेक्षा कमी असल्यास सदर कोटा ० - १०० युनिट वापर करणाऱ्या ग्राहकांसाठी वळविण्याचा अधिकार महावितरण कंपनीच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहील.

८. **योजनेचा कालावधी :-**

सदर योजनेचा कालावधी मार्च २०२७ पर्यंत असेल.

९. **अंमलबजावणी कार्यपध्दती :-**

- या योजनेची प्रसिध्दी महावितरण कंपनीद्वारे करण्यात येईल.
- या योजनेसाठी मुख्य कार्यालय स्तरावर निविदा प्रकाशित करण्यात येईल व त्यानुसार पात्र पुरवठादारांना विभागून काम सोपवले जाईल.
- अर्ज केलेल्या ग्राहकांच्या जागेची तांत्रिक व्यवहार्यता तपासून तेथे छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी परवानगी देण्यात येईल.
- निविदेत पात्र पुरवठादारांकडून पात्र ग्राहकांना १ कि.वॅ. क्षमतेची छतावरील सौर ऊर्जा प्रणाली बसविण्यात येईल.
- आस्थापित करण्यात आलेल्या रुफ टॉप सोलर यंत्रणेची तांत्रिक तपासणी महावितरण कंपनीमार्फत करण्यात येईल.
- नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच तांत्रिक मानदंडानुसार (Technical Specification) सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याची तसेच योजनेच्या गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील.
- या योजनेअंतर्गत वापरण्यात येणारे सोलार मोडयुल्स हे केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सुर्यघर मुफ्त बीजली योजनेप्रमाणे भारतीय बनावटीचे व आय.ई.सी (IEC) प्रमाणित किंवा तत्सम

राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रिय मानांकनानुसार प्रमाणित असतील तसेच पुरवठादार हे आर.एफ.आय.डी (RFID) टॅग सुविधेसह पुरविणारे असतील. याबाबत महावितरणद्वारा सामग्री पुरवठादारांकडील सामग्रीची तांत्रिक मानदंडानुसार पाहणी करुन त्यांच्या योग्यतेबाबत खात्री करण्यात येईल.

- छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित केल्यानंतर ५ वर्षे देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादारांकडे असेल. पुरवठादाराकडून ५ वर्षासाठीचा सर्वंकष देखभाल व दुरुस्ती करार (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर ) महावितरणकडून करुन घेण्यात येईल.

१०. नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच तांत्रिक मानदंडानुसार (Technical Specification) सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याची व गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील.

११. वित्तीय सहाय्य / अनुदानाच्या रकमेची मागणी करुन सदर निधी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही महावितरण मार्फत करण्यात येईल. सदर योजनेचे आवश्यक लेखे महावितरणमार्फत ठेवण्यात यावेत.

१२. योजनेची अंमलबजावणी करताना त्यासाठी आवश्यक असणारे अर्जाचे विहित नमुने, आस्थापना अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र व अनुषंगिक बाबी व तांत्रिक तपासणी नमुना इ. महावितरणमार्फत निर्गमित करण्यात यावेत.

१३. राज्य शासनाच्या व इतर आर्थिक स्त्रोतातून महावितरणमार्फत प्राप्त होणाऱ्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र, भौतिक प्रगती व आर्थिक अहवाल दर ३ महिन्यांनी शासनास सादर करण्यात यावा.

१४. सदर योजना मेळघाट, नंदूरबार, गडचिरोली यासारख्या दुर्गम भागात प्राधान्याने राबविण्यात यावी.

१५. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाने दि.०३.०७.२०२५ रोजी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५१००६१७३६३१२९१० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NARAYAN SHRIKRISHNA KARAD

Digitally signed by NARAYAN SHRIKRISHNA KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57ada a570981f1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AE7FAEABAF4571C2748E4DD5FFD2CD108DE0E130859970 F4D7D0EE40046B3E9E, cn=NARAYAN SHRIKRISHNA KARAD
Date: 2025.10.06 17:40:08 +05'30'

**(ना.श्री.कराड)**
**शासनाचे सह सचिव**

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
२. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा,सभापती/उपसभापती विधानपरिषद,यांचे सचिव.
३. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृह निर्माण), यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. मंत्री अपारंपारिक ऊर्जा,यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई-३२.
७. मा. राज्यमंत्री ऊर्जा, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.

८. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
९. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
१०.सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
११.मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२.अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२.
१३.अपर मुख्य सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२.
१४.अपर मुख्य सचिव (ऊर्जा) मंत्रालय, मुंबई-३२
१५.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१७.कार्यासन अधिकारी (ऊर्जा-३)/ (प्रशासन-१), उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८.निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१९.ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.